# सोलापूर विद्यापीठ गीत

ज्ञानरुप देव धर्म जीवनी असो
करुणेचा अमृतघन या मनी वसो ||

अध्ययनसमृध्द होऊ ध्यास धरोनी
श्रमसंस्कृति वाढवू या यत्न करोनी
ज्ञान कला विज्ञान ध्वजा अंबरी विलसो ||

धर्म जाति पंथभेद जाऊ विसरुनी
पतितांना कवळू या धीर देऊनी
अश्रूंना हसवू ही आस नित ठसो ||

सान थोर उच्च नीच ही सरो निशा
ज्ञानसूर्य उगवुनिया उजळु दे दिशा
प्रगतीचा पथ सात्विक लोचनी दिसो
ज्ञानरुप देव धर्म जीवनी वसो ||

- दत्ता हलसगीकर